# बालरंजनचे सुरेख नाटच प्रयोग




नागपूर, ता. २२

बालनाटच स्पर्धेत सात पारितोषिके मळविलेल्या ''अबोल घुंगरू'' या नाटकाचा प्रयोग स्थानिक धनवटे रंग मंदिरात बहारदारपणे नुकताच सादर करण्यात आला. 'बालरंजन' ने या नाटकाबरोबरच 'अफाट गावची अचाट मावशी' याही बालनाटचाचा प्रयोग कला.

कला ही उपजतच असते, शिक्षणान कलेला फक्त पैलू पाडायचे असतात, हे गोविंद गोडबोल यानी लिहिलेल्या ''अबोल घुंगरू'' या नाटकाचे मुख्य सूत्र. बाल कलाकारांनी आपल्या कलागुणांनी हा विषय समर्थपणे प्रेक्षकांपुढ मांडला. अपर्णा हिवसे, गौरी काळे, संगीता पांड, गोटचा, सुजित देशपांड, स्मिता पटवधन, भास्कर पांडे या सर्वच बाल कलाकारांनी उत्कृष्ट अभिनय करून आपापल्या भूमिकांना योग्य न्याय दिला. मुख्य उषाची भूमिका करणाऱ्या संगीता पांडे या मलीच्या चेहऱ्यावरच भाव अतिशय बोलके होते. नाटकाचे दिग्दर्शन श्री. पराग कुळकर्णी यांना केले.

'अफाट गावची अचाट मावशी' या नाटकाचा प्रयोगही छान झाला. हे बालनाटच श्री. रत्नाकर मिटकरी यांनी लिहिलेले आहे. दिग्दर्शक श्री. संजय पेंडसे यांनी २३-२४ बाल कलाकारांकडून मेहनत करवून घेऊन हा छान प्रयोग सादर केल्याचे जाणवत होते. 'अचाट मावशी' चा पुढचा प्रयोग २६ जानवारीला होत आह.

(छायाचित्रात 'अबोल घुंगरू' या नाटकातील एका दृश्यात सुजित दशपाडे, संगीता पांडे, गोटचा सहस्रबुद्धे दिसत आहेत.